अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर

## लाडक्या बहिणींना गुडन्यूज; निकषांबाबत पत्रकच जारी

**मुंबई** : लाडकी बहीण योजनेच्या निषकांमध्ये आता बदल केला जाणार असल्याचंही बोललं जात आहे. सोशल मीडियावर लाडकी बहीण योजनेच्या निकषांत बदल करण्यात आल्याचं, लाडक्या बहिणींना अपात्र करण्याचं काम सरकारच्यावतीने सुरू असल्याचे मेसेजही फिरत आहेत. त्यामुळे, लाडक्या बहिणींमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

आता, याबाबत स्वत: महिला व बाल कल्याण विभागाने स्पष्टीकरण दिलं आहे. माजी मंत्री व विद्यमान आमदार आदिती तटकरे यांनी याबाबत माहिती देत कुठल्याही अफवांवर विश्वास ठेऊ नका, असे आवाहन राज्यातील लाडक्या बहिणींना केलं आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेबद्दल रिल्स व व्हिडिओच्या माध्यमातून दिशाभूल करणारी माहिती समाज माध्यमांवर प्रसारित करण्यात येत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागू झाल्यापासून आतापर्यंत योजनेच्या निकषांमध्ये कोणताही बदल झालेला नाही, अशी माहिती राज्याच्या महिला व बालविकास विभागाकडून प्रसारीत करण्यात आली आहे. एक महिला लोकप्रतिनिधी म्हणून याबाबतीत मी स्वत: जातीने लक्ष ठेवून आहे. तरी, याबाबत समाज माध्यमांतून होणाऱ्या अपप्रचारास कोणीही बळी पडू नये, असे विनंतीपूर्वक आवाहनही आदिती तटकरे यांनी केले आहे. त्यामुळे, संभ्रमात असलेल्या लाडक्या बहिणींना मोठा दिलासा मिळाला, असून सध्यातरी कुठल्याही निकषात बदल करण्यात आले नसल्याचे स्पष्ट झालं आहे.



# शिंदे गटात 'धुसफूस', भाजपात पिकली 'खसखस'

**सोलापूर/विशेष प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत दणदणीत जनादेश मिळाल्यानंतर महायुतीला सत्ता स्थापनेसाठी १२ दिवस लागले. अद्याप तरी कॅबिनेटचा विस्तार झालेला नाही.सत्ताधाऱ्यांचं संख्याबळ २३७ इतके प्रचंड असल्याने कोणाकोणाला मंत्रिपदी संधी द्यायची हा पेच कायम आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुखमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात गृहमंत्रीपदावरून अजूनही एकमत होत नाहीय.अशातच शिंदे यांच्या शिवसेनेत धुसपूस सुरू झाली आहे. पक्षातील ५ जणांना पुन्हा मंत्री करू नये,अशी मागणी शिंदे गटातील काही आमदारांनी शिंदे यांच्याकडे केली आहे.ही मूळ मागणी भाजपची आहे.त्यामुळे शिंदे गटातील काही आमदारांनी या मागणीचा उठाव करणे म्हणजे भाजपने पाहुण्याच्या हातून साप मारण्याचा प्लॅन आखल्याची चर्चा आहे.शिंदे गटात धुसपूस सुरू झाल्यानंतर भाजपमध्ये मात्र खसखस पिकली आहे.एकंदरीत महायुतीत सुरू असलेले हे नाट्य पाहाता तुझे-माझे जमेना,तुझ्या वाचून करमेना,अशी स्थिती झाली आहे.

भाजपच्या वाट्याला २०, शिवसेनेच्या वाट्याला १२, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला १० मंत्रीपदे जाऊ शकतात. शिवसेनेकडून इच्छुकांची संख्या जास्त आहे. त्यातच आता काही माजी मंत्र्यांना पुन्हा मंत्रीपद मिळण्याची शक्यता धूसर झाली आहे.

शिवसेनेतील अंतर्गत कलहाचा फटका पाच माजी मंत्र्यांना बसू शकतो. माजी मंत्री दीपक केसरकर, अब्दुल सत्तार, दादा भुसे, गुलाबराव पाटील, संजय राठोड यांच्या विरोधात शिवसेनेतच तक्रारीचा सूर आहे. कोणतीही कामे घेऊन गेल्यावर हे पाचजण केवळ आश्वासने देतात. कोणतेही काम मार्गी लागत नाही, अशा तक्रारी या पाच मंत्र्यांविरोधात आहे. त्यामुळे या पाच जणांना मंत्री करण्यास शिवसेनेच्या आमदारांचा विरोध आहे. त्यामुळे त्यांच्या जागी नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता वाढली आहे.

याबद्दल शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांनी पक्षाची भूमिका मांडली. मंत्र्यांविरोधात काही तक्रारी एकनाथ शिंदेंकडे गेल्या असतील, तर ते याबद्दल निर्णय घेतील.

मंत्रीमंडळात कोणाला स्थान द्यायचे याबद्दलचे सर्वाधिकार आम्ही शिंदेंना दिले आहेत. त्यामुळे याविषयी निर्णय घेण्याचा सर्वस्वी अधिकार त्यांचा आहे. त्यावर मी भाष्य करणं योग्य नाही, असे शिरसाट म्हणाले.

संजय राठोड, अब्दुल सत्तार यांच्या नावांना भाजपचादेखील विरोध आहे. मंत्री असताना त्यांच्यावर आरोप झाले होते. त्यामुळे असे नेते मंत्रिमंडळात नको. कॅबिनेटमध्ये स्वच्छ चेहरे असावेत, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आग्रही आहेत. आता सत्तार, राठोड यांच्याविरोधात त्यांच्याच पक्षातून तक्रारी असतील, तर त्यांना मंत्रिमंडळापासून दूर ठेवणे भाजपसाठी अधिक सोपे होणार आहे. शिवसेना आमदारांचाच विरोध भाजपच्या पथ्थ्यावर पडेल,असा सूर उमटत आहे.

## पाहुण्यांच्या हातून साप मारण्याचा नवा प्लॅन

### अशी दिसते शक्यता

गृह, महसूल, गृहनिर्माण, जलसंपदा मंत्रालयं मागील सरकारमध्ये भाजपकडेच होती. ती आताही भाजपकडेच राहण्याची दाट शक्यता आहे. गेल्या मंत्रिमंडळात राष्ट्रवादीच्या धनंजय मुंडेंकडे असलेल्या कृषीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपमध्ये चर्चा सुरु आहे. शिवसेनेला नगरविकास, उत्पादन शुल्क, सार्वजनिक बांधकाम मिळण्याची शक्यता आहे. यातील नगरविकास खातं मुख्यमंत्री झाल्यापासून शिंदे यांच्याकडे आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाही शिंदे यांच्याकडे या खात्याचा पदभार होता. याच खात्याच्या माध्यमातून शिंदेंनी सेनेच्या आमदारांना ताकद आणि निधी दिला. त्यामुळे ह खातं शिंदेंचं आवडतं मानलं जातं. उत्पादन शुल्क गेल्या मंत्रिमंडळातही सेनेकडेच होतं. तर सार्वजनिक बांधकाम खातं याआधी भाजपच्या रविंद्र चव्हाण यांच्याकडे होतं. ते शिवसेनेला मिळण्याची शक्यता आहे

### शिंदेंचा ताठरपणा कायम

फडणवीस सरकारमध्ये बहुतांश खाती भाजप स्वत:कडे ठेवण्याच्या तयारीत आहे. गृह आणि महसूल खाती भाजपकडे कायम राहतील अशी शक्यता आहे. तर शिवसेनेला नगरविकास, राष्ट्रवादी काँग्रेसला अर्थ मंत्रालय मिळू शकते. याचा अर्थ तिढा सोडवण्यासाठी महायुती जुनाच फॉर्म्युला वापरणार असल्याचे दिसत आहे. मागील सरकारमध्येही महत्वाच्या खात्यांचे वाटप अशाच प्रकारे झाले होते. नगरविकास खाते शिंदेंसाठी महत्वाचे आहे. आधीही त्यांनी हे खातं सांभाळलं आहे. पण आता ते नगरविकाससोबतच गृहसाठी आग्रही आहेत.

### शनिवारचा मुहुर्त

मंत्रिमंडळाचा विस्तार १४ डिसेंबरला होण्याची दाट शक्यता आहे. १६ डिसेंबरपासून नागपुरात विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरु होत आहे. त्याआधी कॅबिनेटचा विस्तार केला जाऊ शकतो. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांची एक बैठक झाली. त्यात खातेवाटपावर चर्चा झाली. शिंदे गृह खात्यासाठी आग्रही आहेत पण भाजप ते खाते सोडण्याची शक्यता अतिशय कमी आहे.महत्वाची खाती सोडता अन्य मंत्रालयांची अदलाबदल होऊ शकते. गृह, महसूलसोबतच भाजप गृहनिर्माण, जलसंपदा मंत्रालयंदेखील आपल्याकडेच ठेवेल, असे दिसतेय. राष्ट्रवादी काँग्रेसला सहकार खाते मिळेल. कृषी मंत्रालयासाठी भाजप, राष्ट्रवादीत चर्चा सुरु आहे. शिवसेनेला उत्पादन शुल्क आणि सार्वजनिक बांधकाम विभाग मिळू शकतील. गेल्या मंत्रिमंडळातही जवळपास अशाच प्रकारे खातेवाटप झालेले होते, असे एका भाजप नेत्याने सांगितले.

## लोकांची फसवणूक केल्याबद्दल बोगस डॉक्टरावर गुन्हा

**सांगोला/प्रतिनिधी**

तालुक्यातील लक्ष्मी नगर येथील डॉ. प्रवीण वीरूपक्षपा बडगीरे हे स्वतःच्या राहत्या घरात चार ते पाच वर्षापासून विनापरवाना वैद्यकीय पात्रता परीक्षेचे सर्टिफिकेट नसताना बेकायदेशीरपणे वैद्यकीय व्यवसाय करत होते.

रुग्णाच्या जीवितास व आरोग्यास धोका होईल याची जाणीव असतानाही लोकांची फसवणूक केली म्हणून सांगोला पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केल्याने वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे

तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर अविनाश उत्तम खांडेकर यांनी ११ डिसेंबर रोजी दुपारी दोन वाजता लक्ष्मी नगर येथे भेट दिली. त्यावेळी डॉक्टर बडगिरे हे वैद्यकीय क्षेत्रातील कोणतीही वैद्यकीय प्रमाणपत्र नसताना चार ते पाच वर्षापासून राहत्या घरात वैद्यकीय व्यवसाय करीत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे डॉक्टर अविनाश खांडेकर यांनी सांगोला पोलीस स्टेशन मध्ये डॉक्टर प्रवीण बडगीरे यांच्याविरुद्ध फिर्याद दिली आहे. तपास पोलीस सब इन्स्पेक्टर जाधव हे करीत आहेत.

## भिवंडीतून बेपत्ता झालेले तरुण, तरुणी सोलापुरात सापडले

**पोलिसांनी केले पालकांच्या स्वाधीन! मुस्कान पथकाची कामगिरी**

**सोलापूर/प्रतिनिधी**

राज्यभर मुस्कान १३ अंतर्गत घरातून बेपत्ता झालेल्या मुलांना शोधून त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्याची मोहीम राबविली जात आहे. शहरातील अशोक चौकात अशाच एका मुलीस आणि तरुणाला संशयास्पदरीत्या फिरताना पोलिसांच्या निदर्शनास आले. या दोघांना पोलीस ठाण्यात आणून चौकशी केली असता त्यांचा ठावठिकाणा घेऊन त्यांच्या पालकांच्या स्वाधीन केले. जेलरोड पोलिस ठाण्याच्या मुस्कान पथकाने ही कामगिरी केली. किशोर (बदलेले नाव) (वय २०, सोलापूर), सरिता (बदललेले नाव) (वय १८, रा. भिवंडी, जि. ठाणे) अशी त्यांची नावे असल्याचे पोलिसांनी सांगितले.

जेलरोड पोलीस ठाण्यात दि. ९ डिसेंबर रोजी ऑपरेशन मुस्कान १३ अंतर्गत जेलरोड पोलीस ठाण्याकडून सपोनि जोत्स्ना भांबिष्टे, हवालदार चव्हाण, पोलीस सय्यद, भुजबळ असे पथक नेमले आहे. सोमवारी ते ऑपरेशन मुस्कानदरम्यान कारवाई करीत असताना अशोक चौक परिसरात त्यांना एक तरुण व तरुणी संशयितरीत्या फिरत असल्याचे आढळून आले. त्यांची सखोल चौकशी केली असता मुलाने त्याचे नाव सांगितले. तो खासगी नोकरी करीत असून, कोणालाही न सांगता घरातून आला नसल्याचे समजले. दोघांनाही जेलरोड पोलिस ठाणे येथे आणून रेकार्डवर तपासले असता किशोरची माहिती मिळाली. त्याच्या पालकांना बोलावून घेऊन त्यांच्या स्वाधीन केले. त्यानंतर तरुणीस विश्वासात घेऊन विचारणा केली. तिने पालकांना न सांगता निघून आल्याचे सांगितले. भिवंडी पोलिस ठाण्याशी संपर्क साधला. पोलीस चव्हाण व मुलीची आई रात्री उशिरात सोलापुरात पोहोचले असता तरुणीस त्यांच्या ताब्यात देण्यात आले.

### आयुक्तांकडून प्रशंसा...

पालक आणि मुलांमधील संवाद हरवत चालल्याने मुलं न सांगता बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच १५ ते २२ वयोगटातील मुलं-मुली बाह्य आकर्षणाला भुलून बेपत्ता होण्याची गुन्हे घडत असल्याने अशा प्रकारांवर आळा बसवा यासाठी पोलिसांकडून ऑपरेशन मुस्कान या मोहिमेद्वारे मुलांना पालकांच्या स्वाधीन करण्यात येत आहे.

## कुर्डूवाडी रेल्वे स्टेशनची जनरल मॅनेजर पाहणी करणार

**कुर्डुवाडी** : रेल्वेचे जनरल मॅनेजर यांचा कुर्डुवाडी रेल्वे स्थानकावर १३ डिसेंबर रोजी दुपारपासून प दौरा होणार असल्यामुळे रेल्वे स्थानक सुशोभीकरणासह विविध कामे युध्द पातळीवरून सुरू आहेत. मुंबई येथील रेल्वेचे जनरल मॅनेजर नूतन रेल्वे स्थानक यासह रेल्वे वर्कशॉप मधील कामकाज आदींची पाहणी करणार आहेत. यामुळे रेल्वेचे सर्व विभागाचे अधिकारी रात्रंदिवस काम करून घेण्यासाठी व्यस्त असल्याचे दिसत आहे. मुंबई फास्ट विजापूर एक्सप्रेस, लातूर पुणे इंटरसिटी सुरू करावी, सकाळच्या वंदे भारत एक्सप्रेससाठी पंढरपूरहुन येणाऱ्या प्रवाशांसाठी सकाळी रेल्वे सुरू करावी, रेल्वे वर्कशॉप मध्ये प्रवासी बोगी दुरुस्तीचे काम मिळावे शिंकी हिल आरपीएफ ट्रेनिंग सेंटर बंद आहे त्या ठिकाणी पुन्हा अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्र सुरू करावे. नवीन रेल्वे स्थानकाचे काम त्वरित पूर्ण करून खुले करावे, पुरुष व महिला शौचालय नसल्यामुळे महिला प्रवाशांची गैरसोय होत आहे. या सह विविध मागण्यासाठी नागरिक व सामाजिक संघटना जनरल मॅनेजर यांना निवेदन देणार आहेत.

## अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा

**सोलापूर** : जुना तुळजापूर नाका येथील रुपाभवानी मातेच्या मंदिराच्या बाजूस विद्युत पारेषण कंपनीच्या ऑफिस शेजारी नाल्यात अज्ञात इसमाने पुरुष जातीचे अर्भक टाकल्याची घटना घडली. याप्रकरणी पोलिस हेडकॉन्स्टेबल विठ्ठल पांडुरंग पैकेकरी (ने.जोडभावी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

कोणीतरी अज्ञात इसमाने पुरुष जातीचे अर्भक जिवंत जन्मास प्रतिबंध करण्याचे किंवा त्याचे जन्मानंतर त्या अर्भकचा मृत्यू घडवून आणण्याचे उद्देशाने फेकून देऊन मृत्यूस कारणीभूत ठरल्याचे फिर्यादीत नमूद आहे. तपास पो.स.ई ये.डे. हे करीत आहेत.

## घेरडीत सासू-सूनेवर वन्यप्राण्याचा हल्ला

**सांगोला** : सांगोला तालुक्यातील घेरडी येथील बुरंगले वस्तीवर दोघी सासू-सूनेवर वनप्राण्याने गंभीर हल्ला केला असून यात सासू हिराबाई शिवाजी बुरुंगले (वय ५५) ह्या गंभीर जखमी झाल्या आहे. तर सुनबाई सारिका तानाजी बुरुंगले (वय ३२) ह्याही यात जखमी झाल्या आहेत.

या दोन्हीही महिला सांगोला येथील खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. हिराबाई यांची प्रकृती गंभीर आहे. एवढी मोठी घटना घडूनही सुस्तावलेले प्रशासन बेफिकीर असून एरव्ही नको त्या गोष्टीचे राजकारण करण्यात धन्यता मानणाऱ्या नेतेमंडळींनीही या घटनेकडे पाठ फिरविली आहे. तालुक्यातील जनतेला कोणी वाली आहे की नाही ? असा प्रश्न या भागातील ग्रामस्थांमध्ये उपस्थित केला जात आहे. प्रारंभी या दोघी जखमी महिलांना उपचारासाठी दवाखान्यात कोणीही दाखल करून घेत नव्हते. सांगोला येथील एका खाजगी दवाखान्यात या दोन्ही महिला उपचार घेत आहेत. या घटनेबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी तुकाराम जाधवर यांना विचारले असता नेमका हल्ला कशाने केला माहीत नाही? आमच्या वनपाल वायमोडे यांनी पंचनामा केला आहे. चौकशी करून सांगतो असे ते म्हणाले. त्यांनी याबाबत काहीच माहिती दिली नाही. वनरक्षक मुंडे यांची प्रत्यक्ष भेट घेतली असता मलाही याबाबत कल्पना नाही. मात्र एक महिला गंभीर आहे, एवढेच ते बोलले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

त्यांचे सरकार येऊन सुरू पण झाले,आता आपले बघा!!

कल्याण
488-00-299

मुंबई
345-24-257

## ईव्हीएमबाबत सुप्रीम कोर्टात जाणारः खा. प्रणिती शिंदे

**सोलापूर/प्रतिनिधी**

संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. संसदेच्या सभागृहांमध्ये इंडिया आघाडीचे सदस्य केंद्रातील भाजपा एनडीए सरकारला अनेक मुद्द्यांवरून कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करत आहेत. अदानी, ईव्हीएम, मणिपूरवरून काँग्रेसकडून भाजपावर सातत्याने हल्लाबोल केला जात आहे. तर राज्यसभेत उपराष्ट्रपतींविरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्यासाठी इंडिया आघाडीने मोर्चेबांधणी केली आहे. यातच ईव्हीएमबाबत आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाणार असल्याचे काँग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांनी बुधवारी संसद परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

आम्हाला संसदेचे कामकाज चालवायचे आहे. शून्य प्रहरात मणिपूर प्रश्नासंदर्भात चर्चेचा प्रस्ताव ठेवला होता. मणिपूरवासीयांच्या मनात तीन प्रश्न आहे. एक म्हणजे पंतप्रधान मोदी मणिपूरला केव्हा जाणार, दुसरे म्हणजे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह संसदेला याबाबत निवेदन कधी देणार आणि तिसरा प्रश्न म्हणजे मणिपूरबाबत चर्चा करायची नसल्याने सोरोस प्रकरणाची ढाल करण्याचा प्रयत्न भाजपाकडून केला जात आहे. हे तीन मुद्दे आम्ही मांडतो, तेव्हा भाजपा खूपच अस्वस्थ होते, अशी खोचक टीका शिंदे यांनी केली.

भाजपाला कोणत्याही मुद्द्यांवर चर्चा करायची नाही. मग तो ईव्हीएमचा मुद्दा असो, अदानींचा मुद्दा असो की मणिपूरचा मुद्दा असो. त्यामुळेच भाजपाला संसदेचे कामकाज चालवायचे नाही, हेच यातून दिसते. तसेच ईव्हीएमबाबत आम्ही सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार आहोत. महाराष्ट्र आणि हरयाणातील निकाल ईव्हीएममध्ये फेरफार करून लागलेले आहेत.

महाराष्ट्रातील मुख्यमंत्री ईव्हीएम मुख्यमंत्री आहेत. जनतेत नाराजी आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच असे घडते आहे की, एखाद्या पक्षाला एवढा मोठा जनधार मिळूनही जनता आनंदी दिसत नाही. ज्यांच्यासाठी मतदान केले, ते निवडून न आल्याची खंत मतदारांमध्ये आहे, असा मोठा दावा शिंदे यांनी केला.

दरम्यान, संसदेच्या हिवाळी अधिवेशनात काँग्रेस अदानी मुद्द्यावरून सातत्याने सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करत आहे. विविध मुद्द्यांवरुन सरकार आणि विरोधकांमध्ये दररोज खडाजंगी पाहायला मिळत आहे. विरोधक संसदेबाहेरही रोज नवनव्या पद्धतीने आंदोलन करताना दिसत आहेत. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू आहे. अदानी मुद्द्यावरून सरकारला कोंडीत पकडण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे. संसदेसह बाहेरदेखील या मुद्द्यावरुन काँग्रेसने आक्रमक पवित्रा घेतल्याचे पाहायला मिळत आहे.